# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०८/२०२६ ( रविवार )**

---

**नागपूर ग्रामीण पोलिसांनी गंभीर गुन्हे करून वर्चस्व निर्माण करणाऱ्या तसेच दहशत पसरविणाऱ्या ६ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये कारवाई केली.**

**पोलीस स्टेशन उमरेड** :– मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात उमरेड पोलीसांनी **गंभीर गुन्हे करून वर्चस्व निर्माण करणाऱ्या तसेच दहशत पसरविणाऱ्या आरोपीतांच्या** टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ६ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे क्रं **१) सागर सुधाकर नारनवरे, वय ३१ वर्षे, रा. राहुलनगर, सोमलवाडा, नागपुर, आणि टोळी सदस्य २) हर्षल सुधाकर हिवाळे, वय ३० वर्षे, रा. राहुलनगर, सोमलवाडा, नागपुर,३) सौरभ वामनराव गजबे, वय ३१ वर्षे, रा. न्यु हनुमान मंदीरजवळ, राहुलनगर, सोमलवाडा, नागपुर,४) पवन राजु शिवनकर, वय २० वर्षे, रा. बेसुर, ता. भिवापुर,५) बद्री उर्फ सुनिल दत्तुजी नारनवरे, वय ६१ वर्षे, रा. खंडाळझरी, ता. भिवापुर,६) दत्तु उर्फ नागेश सुनिल नारनवरे, वय २२ वर्षे, रा. खंडाझरी, ता. भिवापुरहे** आहेत.

पोलीस स्टेश.न उमरेड येथे अप क्र. ७४५/२०२६ कलम १०९(१),३(५) भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल आहे. फिर्यादी नामे भुषण बंडुजी चौधरी, वय २३ वर्षे, रा. बेसुर, ता. भिवापुर, जि. नागपुर हा गुन्हयातील जखमी इसम सुरज किसना निवटे, वय २५ वर्षे, रा. बेसुर, ता. भिवापुर याचे शिवमराठा गॅरेजसमोर त्याचे मित्रासोबत बसलेला असताना यातील आरोपी क्र. १ आणि ४ ते ६ यांनी घटनास्थळी वर नमुद घटना तारीख व वेळी येवुन जखमीस लाकडी दांडयाने व चाकुने मारहाण करून पळुन गेले. जखमीचे उपचार नागपुर येथे नंदनवारी हॉस्पीटल येथे सुरू आहेत अशा तोंडी तक्रारीवरून पो.स्टे. उमरेड येथे गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपी क्र. २ व ३ यांची वाढ व कलमवाढ करण्यात आली असुन आरोपीकडुन गुन्हयात वापरलेले हत्यार, वाहने व त्यांचे कपडे जप्त करण्यात आले.नमुद सर्व आरोपींना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख **सागर सुधाकर नारनवरे, रा. राहुलनगर, सोमलवाडा, नागपुर** हा आहे. तो स्वत: संघटीतपणे तसेच नवनविन टोळी सदस्यांना हाताशी धरुन परीसरात दहशत निर्माण व्हावी या गुन्हेगारी उद्देशाने **मारहाणीचे व जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे**, **महिलांविरोधी अपराध करणे** यासारखे गंभीर गुन्हे वारंवार करीत असतो. अभिलेखावर त्याचे विरुध्द तसेच त्याचे साथिदारा विरुध्द अनेक गुन्हे नोदं आहेत. सदर टोळीप्रमुख हा नागपुर ग्रामीण आणि शहर परीसरात दहशत निर्माण करून वर्चस्व प्रस्थापीत करण्याचे हेतुने टोळी सदस्यांना हाताशी धरून विविध प्रकारचे गंभीर गुन्हे करतो. यामुळे पोलीसांनी टोळी प्रमुख व त्याचे साथीदारांना दिनांक १२/११/२०२४ रोजी नागपुर शहर आणि ग्रामीण हद्दीमधुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केले होते. **तरी त्याने नागपुर शहरातील सदस्य सोबत घेवुन नागपुर ग्रामीण हद्दीमधील सदस्यांच्या सोबतीने सदरचा गंभीर गुन्हा करून वचर्स्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. टोळी प्रमुख व टोळी सदस्याला एम.पी.डी.ए. तसेच हद्दपार सारख्या प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करून सुध्दा त्यांनी गुन्हे करणे सुरूच ठेवले आहे. तसेच नमुद आरोपींचा गुन्हेगारी अभिलेख बघता त्यांच्या विरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कारवाई करण्यात आली.**

**उमरेड पोलीसांनी नमुद ६ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**



सागर सुधाकर नारनवरे



सौरभ वामनराव गजबे



दत्तु उर्फ नागेश सुनिल नारनवरे



पवन राजु शिवनकर



बद्री उर्फ सुनिल दत्तुजी नारनवरे



हर्षल सुधाकर हिवाळे

## ७.१३ ग्रॅम अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) सह ०७ लाख ६५ हजार ६५० रूपयाचा मुद्देमाल जप्त, १ आरोपी अटक
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :–** दिनांक २९/०८/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक नागपूर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ बाबत खात्रीशिर माहीती दिली. नमुद पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण, श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी नागपूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद पथकाने बुट्टीबोरी पोलीसांसह संयुक्त कारवाई करत पेट्रोलींग दरम्यान एमआयडीसी चौक परिसरात एक पांढऱ्या रंगाची ईको स्पोर्ट फोर्ड कंपनीची कार क्र. एम एच–१२/एम

बी—७४४३ ही एमआयडीसी चौक ते पुण्यनगरी प्रेस रोडवर शासकिय वाहन पाहुन संशयास्पदरित्या पळुन जातांना दिसुन आली. पोलीसांचा संशय बळावल्याने त्याचा शिताफीने पाठलाग करुन नमुद वाहनास ताब्यात घेतले. नमुद वाहनात आरोपी एजाज गुलाम शेख, वय ३४ वर्षे, राह वार्ड क्र ०३, बुट्टीबोरी तह. जिल्हा नागपुर हा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची आणि वाहनाची झडती घेतली अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) मिळुन आला.

. **नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) ७.१३ ग्रॅम किंमती ३५,६५०/—रुपये , ०१ ॲडरॉईड मोबाईल, ०१ आयफोन व कार क्र. एम एच—१२/एम बी—७४४३, रोख १०,०००/—रूपये असा एकुण ७,६५,६५०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे कलम ८(क), २० (ब) ,२९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे. साखळी पुरावे जोडुन नागपूर ग्रामीण पोलीस तपास करीत आहे.**



## नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवली अवैध दारूविरोधात विशेष मोहीम

## दारूबंदी कायद्यान्वये २१ गुन्हे दाखल

**दिनांक २९/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध विशेष जनजागृती व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २१ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०६ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे ०४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन अरोली** येथे १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे १ गुन्हा नोंद

**नमुद कारवाईत एकुण ३६९० मिली देशी दारू, ४९ लिटर मोहाफुल दारू, ४०१० लिटर मोहाफुल सडवा असा एकुण १,६१,७९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०५ गुन्हे नोंद.

## एकुण ६२३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २९/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ६२३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०५ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. तसेच दुसऱ्या ठिकाणी ०४ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. असे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे ०३ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे अरुन रामकृष्ण राउत, वय ४२ वर्ष, रा. दहेली, ता. जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा

जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ आरोपी आणि ०३ विधीसंघर्षग्रस्त बालक हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर
## एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २९/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपी आणि ०१ विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी १) शाहनवाज जुबेर खान, वय ३४ वर्ष, राहणार वार्ड क्र. ०२, वटेघाट पोस्ट टाकळघाट जिल्हा नागपूर हा बुटीबोरी ते उमरेड रोडवरील पुलाचे खाली सार्वजनिक ठिकाणी तसेच आरोपी २) रोशन श्यामराव शिरपूकर, वय ४३ वर्ष, राहणार प्लाट नंबर ६१, महाविष्णु नगर नरसाळा रोड, दिघोरी नागपुर तालुका जिल्हा नागपुर हा मौजा रूईखैरी शिवार वर्धा वाय पॉईंट पुलाचे खाली सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोस्टे अरोली अंतर्गत आरोपी** १) प्रशांत मोरेश्वर ढोमने, वय ३२ वर्षे, रा. कोदामेंढी, ता. मौदा २) आकीब मोबीन पठाण, वय २६ वर्षे, रा. कोदामेंढी ता मौदा हे सावंगी शिवार हनुमान मंदिराचे मागे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. आरोपी १) आमीन यासीन पठाण, वय २७ वर्षे, रा कोदामेंढी, ता मौदा २) विधीसंघर्षग्रस्त बालक हे सावंगी शिवार सुर नंदी पुलीयावर सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**